# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.03.2026** **वार- शुक्रवार**

---

**पेट्रोलियम मंत्रालय**

आखाती देशातली सद्यस्थिती लक्षात घेऊन पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू पुरवठा मंत्रालयानं नागरिकांना स्वयंपाकाचा गॅस आणि पेट्रोलियम उत्पादनं काटकसरीनं वापरण्याचं आवाहन केलं आहे. देशात सध्या स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा आहे तसंच पुरेसा राखीव साठादेखील आहे असं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**वीज मागणी**

राज्यात ऐन मार्च महिन्यातच उन्हाचा चटका वाढला आहे. त्यामुळे विजेच्या मागणीतही वाढ झाली आहे. जानेवारी, फेब्रुवारी महिन्यांत सुमारे २४ ते २५ हजार मेगावॅटच्या आसपास विजेची मागणी होती. ती आता २६ हजार ९४७ मेगावॅटवर पोचली आहे. पुण्यातही वीजेची मागणी ५ हजार मेगावॅट होण्याचा अंदाज असल्याची माहिती महावितरणच्या पुणे परिमंडलातील अधिकाऱ्यांनी दिली.
दरम्यान, आखातातल्या युद्धाच्या स्थितीमुळे गॅसटंचाई निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांचा इलेक्ट्रिक शेगड्या खरेदी करण्याकडं कल वाढलेला आहे. त्यामुळे शहरातली विजेची मागणी वाढत जाण्याची शक्यता आहे.

**सुनेत्रा पवार**

बारामती इथं महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिसरात उभारलेल्या गेटझनर उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटन आज पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते झालं. या प्रकल्पामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून उद्योजकांनाही नव्या संधी मिळतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. हा प्रकल्प थेट परकीय गुंतवणुकीतून साकारला असून देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढवणे, आयातीवरील अवलंबित्व कमी करणे तसेच ‘मेक इन इंडिया’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ या संकल्पनांना बळकटी देणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे असं त्यांनी सांगितलं.

**अर्थसंकल्प**

पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी आगामी आर्थिक वर्षाचा १३ हजार ९९५ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प स्थायी समितीला सादर केला आहे. आता स्थायी समिती यात काही सुधारणा करत आणि काही योजना वाढवत अंतिम अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेला सादर करेल. त्य़ानंतर स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले २४ मार्च रोजी अंतिम अर्थसंकल्प सादर करतील.

**स्वच्छता सर्वेक्षण**

स्वच्छ सर्वेक्षण 2026 अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेनं स्वच्छता उपक्रमांना अधिक वेग देत कचरामुक्त, स्वच्छ आणि सुंदर शहरासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. यामध्ये कचरा विलगीकरण, स्वच्छ रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छतेवर विशेष भर दिला जात आहे. कचरा कुंडीमुक्त परिसरासाठी विशेष स्वच्छता पथके तैनात करण्यात आली असून सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरुस्ती, स्वच्छता आणि पाणी-वीज व्यवस्था सुरळीत ठेवण्यावरही प्रशासन लक्ष केंद्रित करत आहे.

**श्वान उपद्रव**

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी दाखल केलेल्या पशुवैद्यकीय विभागाशी संबंधित तक्रारींचं अधिक वेगानं आणि प्रभावीपणे निवारण करण्यासाठी महानगरपालिकेने क्षेत्रीय स्तरावर नवीन यंत्रणा कार्यान्वित केली आहे. श्वानांच्या उपद्रवाबाबत नागरिक आणि नगरसेवकांना त्यांच्या समस्या थेट मांडता याव्यात आणि त्यांचं तातडीनं निराकरण व्हावं या उद्देशानं महापालिकेनं हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे तक्रारींचं वेळेत निरसन होण्यात मोठी मदत होणार आहे.

**निवड**

न्यूयॉर्क इथल्या संयुक्त राष्ट्रांच्या वार्षिक महिला आयोगाच्या परिषदेत पुण्यातील वैद्य ईशानी बेंडाळे सहभागी झाल्या आहेत. याआधी दोन वेळा त्या या परिषदेत सहभागी झाल्या होत्या. या परिषदेत त्या महिलांचे आरोग्य, न्यायप्रवेश आणि समानतेशी संबंधित मुद्दे मांडणार आहेत. न्यूयॉर्कमधल्या संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात होत असलेल्या या परिषदेत जगभरातील सरकारांचे प्रतिनिधी, धोरणकर्ते आणि नागरी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

**एमआयटी केंद्र**

एमआयटी विश्वशांती विद्यापीठानं दौंड तालुक्यात बोरीबेल इथं उभारलेल्या ‘लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर’चं उद्घाटन योगगुरू स्वामी रामदेव यांच्या हस्ते काल झालं. या केंद्रामुळे विद्यार्थ्यांना चारित्र्यनिर्मिती, व्यक्तिमत्त्व विकास आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळेल, असा विश्वास स्वामी रामदेव यांनी व्यक्त केला. विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ कराड या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 38 तर किमान 18 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमान असंच असेल आणि आकाश निरभ्र राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**